| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस अधीक्षक कार्यालय जळगांव<br>जिल्हा विशेष शाखा, जळगांव<br>फोन नंबर ०२५७-२२३३५६८<br>Email Id-pidsb.jalgaon@gmail.com | पुण्यश्लोक ३०० |

प्रति,

मा. संपादक
दैनिक ..................................

विषय : -जळगाव जिल्ह्यात दि.०२/१०/२०२५ व दि.०३/१०/२०२५ रोजी नवदुर्गा विसर्जन दसरा, रावण दहन व धम्मचक्र प्रवर्तन दिन ,RSS पथसंचलन, याबाबत आपले दैनिंकात प्रसिध्दी देणे करीता.

----oooo-----

जळगाव शहर व जिल्हयात देवी विसर्जन, धम्मचंद्र प्रवर्तन दिन सुरक्षीत व शांततेत पडावा यासाठी पोलीस विभागाने खालिल प्रमाणे विशेष बंदोबस्ताची तयारी केली आहे.

दि.०२/१०/२०२५ रोजी जिल्ह्यात नवदुर्गा विसर्जन सार्वजनीक ३४१,खाजगी -१०९ , २५ ठिकाणी RSS पथसंचलन असुन १६ ठिकाणी रावन दहन असे कार्यक्रम होणार आहेत. तसेच धम्मचंक्र प्रवर्तन दिनानिमित्त मिरवणुका, पुतळापुजन, प्रतिमा पुजन कार्यक्रम होणार आहेत

दि.०३/१०/२०२५ रोजी जिल्ह्यात नवदुर्गा विसर्जन सार्वजनीक १५२८,खाजगी -१८२ व रथउत्सव कार्यक्रम १) पारोळा २)धरणगाव ३)चोपडा ४)मेहुणबारे (बहाळरथाचे) या ठिकाणी होणार आहेत.

नवदुर्गा उत्सव अनुषंगाने पोलीस स्टेशन स्तरावर नवरात्र मंडळाच्या ८१ बैठका , मोहल्ला कमिटी -३० बैठका , शांतता समिती ४१ बैठका , मौलाना धर्मगुरु यांचे १० बैठका , वाद्य धारक २८ बैठका , पोलीस पाटील - ३३ बैठका , पोलीस मित्र -१४ बैठका इतर विभागाचे २८ बैठका घेण्यात आल्या आहेत. दि.०२/१०/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी जळगाव यांचे आदेशाने २४:०० वाजे पावेतो ध्वनी क्षेपकाची परवानगी आहे. त्यानंतर इतर दिवशी मिरवणुकांना रात्री २२:०० वाजे पर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी आहे.

जळगाव जिल्ह्यात सन उत्सव कालावधीत अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पुढील प्रमाणे प्रतिबंधक कारवाया करण्यात आलेल्या आहेत.

१)BNSS १२६ अन्वये - ४२८ लोकांकडुन शांतता राखण्यासाठी बॉन्ड भरुन घेतले
२)BNSS १२८अन्वये - ०५ लोकांकडुन शांतता राखण्यासाठी चांगल्या वर्तवणुकीसाठी बॉन्ड भरुन घेतले
३) BNSS १२९ अन्वये -३० लोकांकडुन शांतता राखण्यासाठी चांगल्या वर्तवणुकीसाठी बॉन्ड भरुन घेतले
४)BNSS १६३ अन्वये -६२९ लोकांना पोस्टे हद्दीतुन तडीपार करण्यात आले आहे.
५) BNSS १६८ अन्वये -२६४९ लोकांना शांतता राखण्यासाठी नोटीसीव्दारे समज देण्यात आली आहे.
६) म.पो.का.कलम ५५,५६ अन्वये - ८ लोकांना हद्दीतुन हद्दपार करण्यात आले आहे.
७)MPDA अन्वये -०२ इसमांवर हद्दपार कारवाई करण्यात आलेली आहे.

**बंदोवस्त :**-जळगाव जिल्ह्यात दि.०२/१०/२०२५ व दि.०३/१०/२०२५ रोजी जळगाव जिल्हयातील एक पोलीस अधिक्षक ,अपर पोलीस अधीक्षक -०२ ,पोलीस उपविभागीय अधीकारी -०८ , पोलीस निरीक्षक -२९, सहा. पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक -१४३ , पोलीस अंमलदार-२४९७, RCP प्लाटुन -०८, SRPF प्लाटुन -०३ ,QRT -०२, स्ट्रा. फोर्स -०८ , होमगार्ड -१६००+२०० अशा स्वरुपाचा पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

१) मा. पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेशाने एक मंडळ एक पोलीस अंमलदार ही योजना राबविली असुन तसेच दुर्गा देवी विसर्जन मार्गावर एक कॅमेरा पोलीसांसाठी या संकल्पनेतुन CCTV कॅमेरा बसविण्यात आले आहे तसेच मुख्य चौकात विसर्जन मार्गावर CCTV कॅमेराच्या निगराणीमध्ये आहोत असे फलक लावण्यात आले आहे.

**नवदुर्गा मंडळे व रावण दहन आयोजक व जनतेस सुचना :-**

१) नवरात्र उत्सव काळात वाद्य मोठ्या आवाजात वाद्य लावु नये व आवाजाची मर्यादा ७५ डेलीबल पेक्षा कमी ठेवावी.

२) नवदुर्गा मंडळानी विसर्जन मिरवणुका आपल्या निर्धारीत व पारंपारीक मार्गाने मिरवणुका काढाव्यात.

३) मिरवणुका ठरवुन दिलेल्या निर्धारीत वेळेत पुर्ण कराव्यात.

४)इतर धर्मियांचे धार्मिक भावना दुखावणार नाहीत अशा प्रकारचे हावभाव, गाणे, वाद्य वाजवु नये.

५) मिरवणुकीत कोणत्याही धर्मियांच्या भावना दुखावतील असे देखावे सादर करु नये.

कृपया या वरील माहितीस आपल्या दैनिकात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी जळगाव जिल्हा पोलीस**